अंगणात बसलेल्या आई व दोन मुलींचा वीज पडून मृत्यू

चंद्रपूर : दुपारच्या सुमारास मायलेकी अंगणात बसून असताना अचानक वीज पडली आणि त्यात आई आणि दोन मुलींचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना दुर्गापूर पोलीस स्टेशन हद्दीत येणाऱ्या वरवट येथे घडली. मृतकांचे नाव संगीता रामटेके, रागिणी आणि प्राजक्ता असे आहे.

थोडक्यात महत्त्वाचे

दामदुप्पट परताव्याच्या आमिषाने फसवणूक

पुणे : फायनान्स कंपनीत गुंतवणुक केल्यास चांगला परतावा मिळवुन देण्याचे आमिष दाखवत एका सॉफ्टवेअर अभियंत्याची तब्बल ४७ लाख ८० हजार रुपयांची फसवणुक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी चतृश्रृंगी पोलीस ठाण्यात बुधवारी (ता. २२) गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. दिपक रमेश शिंदेअसे संशियिताचे नाव आहे. याबाबत गौरव रामकुमार गोयल यांनी पोलीसांकडे संशयिताविरोधात तक्रार दिली. हे प्रकरण १० डिसेंबर २०२१ ते २० एप्रिल २०२२ यादरम्यान घडला.

दुकानातील साहित्य चोरून नाल्यात फेकले

नांदेड : दुकानातील साहित्य चोरून ते सर्व नाल्यात टाकून दिले. याप्रकरणी मुक्रामाबाद पोलिसांनी ७ जणांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. राजूरा (बु) ता. मुखेड येथील मेकॅनिक बालाजी नरसींग कोरकोडे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार राजूरा गावात त्यांच्या एका टिनपत्राच्या दुकानात ठेवलेले साहित्य गायब झाले. हा प्रकार १८ जूनच्या सकाळी ८ वाजता समजला. त्या टिनपत्राच्या दुकानात विद्युत मोटारी, विद्युत साहित्य, खत, सोयाबीन बॅगा आणि रोख ५० हजार रुपये असे २ लाख ३१ हजार रुपयांचे साहित्य होते. मुक्रमाबाद पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून पोलीस अंमलदार आडेकर अधिक तपास करीत आहेत.

आत्महत्येप्रकरणी पत्नीसह चौघांवर गुन्हा

नांदेड : एका २९ वर्षीय व्यक्तीने आत्महत्या केल्यानंतर पत्नीसह चार जणांवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी विमानतळ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मिना प्रदिप कुलकर्णी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार १७ जून २०२२ रोजी पौर्णिमानगर येथे ओंमकार प्रदीप कुलकर्णी (२९) यांनी गळफास घेवून आत्महत्या केली. त्यानंतर २० जून रोजी मिना कुलकर्णी यांनी तक्रार दिली. आर्थिक पिळवणूकीला कंटाळून ओमकार प्रदीप कुलकर्णीने गळफास घेवून आत्महत्या केली आहे. विमानतळ पोलीसांनी याबाबत गुन्हा गुन्हा दाखल केला असून पोलीस निरिक्षक अनिरुध्द काकडे यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरिक्षक जाधव तपास करीत आहेत.

हिंदूंच्या अवनतीसाठी मुस्लीम, इंग्रजांना दोष देणे सोडा!

सरसंघचालक मोहन भागवतांचे आवाहन

वार्ताहर/नागपूर

आपल्याला कायम दुसऱ्यांना दोष देण्याची सवय जडली आहे. हिंदू समाजाची अवनती का झाली तर यासाठी आम्ही मुस्लीम आणि इंग्रजांना दोषी ठरवतो. ही दोष देण्याची प्रवृत्ती सोडून अनुभवातून शिकत सुधारायला हवे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले.

संघाचे माजी बौद्धिक प्रमुख आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. रामभाऊ तुपकरी यांच्या 'पॅशन इन ॲक्शन' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. भागवत यांच्या हस्ते मंगळवारी करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. दुसऱ्यांना दोष दाखवल्याने आपण अशक्त होतो. हिंदू समाजाच्या अवनतीसाठी मुस्लीम, इंग्रजांकडे बोट दाखवून काही होणार नाही. अनुभवातून शिकणे आणि आपल्यात सुधारणा करणे आवश्यक आहे, असे डॉ. भागवत म्हणाले.

डॉ. रामभाऊ तुपकरींच्या पुस्तकाचे प्रकाशन

वाईट आहे ते सोडून द्या

वाईट आहे ते सोडून द्या. जग बदलण्याची जबाबदारी कुणी एका व्यक्तीने घेतलेली नाही. तसे प्रयत्न करायला हवे, त्यात काही गैर नाही. मात्र, सगळ्या जगाच्या चिंतेचा भार आपल्या डोक्यावर घेणे हे आपले काम नाही. रामभाऊंच्या पुस्तकात अशा अनेक गोष्टींवर उपदेश करण्यात आला असून सर्वांनी ते वाचावे, असे आवाहनही डॉ. भागवत यांनी केले.

फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत म्हणून पुण्यात भाजपची बॅनरबाजी

वार्ताहर/पुणे

राज्यातील राजकारण विविध घडामोडींनी सध्या ढवळून निघाले असल्याने विकास आघाडीचे सरकार अस्थिर झाल्याचे पाहावयास मिळत आहे. अशावेळी नेमकी पंढरपूरच्या आषाढी वारीच्या महापूजेचा मान कोणाला मिळणार यावरून चर्चा रंगल्याचे दिसून येत आहे.' विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस हे पुन्हा मुख्यमंत्री होऊ दे आणि त्यांना महापूजेचा मान मिळू दे' अशा प्रकारचे बॅनर पुण्यात वारीच्या मार्गावर लावल्याचे पाहावयास मिळत आहे.

पुण्यातील शिवाजीनगर भागातील भाजपचे पदाधिकारी प्रकाश सोलंकी आणि रवींद्र साळेगावकर यांनी वारीच्या मार्गावरील शिवाजीनगर भागात पाटील इस्टेट परिसरात अशा संदर्भातले बॅनर लावल्याने येणाऱ्या-जाणाऱ्या वारकरी आणि नागरिक उत्सुकतेने बॅनर पाहत आहे.' हे माऊली तुझा कृपा आशीर्वाद सदैव राहू दे, तुझ्या पंढरपूरच्या पुजेला मुख्यमंत्री म्हणून देवेंद्रजी येऊ दे' अशा प्रकारचा आशय लिहिलेला मोठा बॅनर शिवाजीनगर उड्डाणपुलाच्या खालील भागात लावण्यात आलेला आहे. या बॅनरवर माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांचा पंढरपूर येथील महापूजा करतानाचा फोटोही लावण्यात आलेला आहे.


हे माऊली तुझा कृपा आशीर्वाद सदैव राहू दे तुझ्या पंढरपूर च्या पूजेला
मुख्यमंत्री म्हणून
देवेंद्रजी येऊ दे !
प्रकाश सोलंकी
रवींद्र साळेगावकर

महापूजेचा मान मिळणार का?

विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत या दृष्टीने भाजपच्या वतीने मोठ्या प्रमाणात दिल्ली आणि मुंबईत हालचाली सुरू असल्याचे दिसत आहे. त्यातच सेनेचे ज्येष्ठ आमदार एकनाथ शिंदे यांच्यासह इतर आमदारांनी भाजपसोबत सरकार स्थापन करावे, अशी अटच शिवसेनेच्या नेतृत्वाला घातली आहे. त्यामुळे खरंच फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री होणार का आणि त्यांना पंढरपूरच्या आषाढी वारी महापूजाचा मान मिळणार का? अशी उत्सुकता लागली आहे.

वन्यजीवांची तस्करी करणाऱ्याला अटक

नागपूर : नागपूरमध्ये मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे वनविभागाने सापळा रचून वन्यजीव अवयवांची तस्करी करणाऱ्यांना अटक केली. त्यांच्याकडून जप्त करण्यात आलेले अवयव तपासणीसाठी बुधवारी पुणे येथे प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. वनविभागाने पथकाने नागपुरातील शिवशंकर एजंसी या दुकानात बनावट ग्राहक पाठवला. तिथे अपेक्षित अवयव मिळताच बनावट ग्राहकाने इशारा केल्यानंतर दबा धरून बसलेल्या पथकाने छापा मारला. तिथून अवयव जप्त केले. तसेच दुकान मालक मयूर मधुसूदन गुप्ता यांनाही ताब्यात घेतले. त्यांच्याकडून घोरपडीच्या अंगाचे अवयव असलेल्या हाताजोडीचे १८ नग, प्रवाळावर पोसणारा किटक सी-फॅन्स व घोरपडीचा प्रकार असलेल्या प्राण्याच्या डोक्याचा वरचा रंगमाही हा भाग जप्त केला आहे.

विश्वविक्रमी रस्त्याला १५ दिवसांत तडे

अकोला : अमरावती ते अकोलादरम्यान राष्ट्रीय महामार्ग क्र. ५३ वरील लोणी ते मूर्तिजापूरपर्यंत ४०.२०० कि.मी. रस्त्यावर डांबरीकरणाचा थर टाकण्याचा विश्वविक्रम राजपथ इन्फ्रा. कंपनीने ७ जूनला रचला खरा, पण या कामाला १५ दिवस उलटत नाही तोच या विश्वविक्रमी रस्त्याला तडे गेल्याचे उघडकीस आले आहे.

जाहीर सूचना

श्रीम. सुनंदा शिवराम कुराडे या आशिष को–ऑप. हाऊसिंग सोसायटी लि., प्लॉट क्र. ६, मुलजी नगर, एस. व्ही. रोड, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९२ च्या सभासद आणि शेअर्स ८६ ते ९० आणि फ्लॅट क्र. बी/१ च्या सुद्धा धारक ज्यांचे २०.०५.२०२० रोजी निधन झाले. त्यांच्या नामनिर्देशित सौ. सुरेखा एन. कुराडे यांनी सदर मयत सभासदाच्या जागी सोसायटीमधील त्यांच्या सभासदत्वाकरिता सोसायटीला अर्ज केला आहे. तथापि, त्यांनी असे सांगितले आहे की, त्यांच्याकडून दिनांक २७.०४.१९८५ रोजीचे मूळ शेअर प्रमाणपत्र क्र. १८ हरवले किंवा गहाळ झाले आहे. सोसायटी त्यांना प्रतिलिपी शेअर प्रमाणपत्र जारी करण्याकरिता प्रस्तावित आहे. सदर सोसायटी त्यांना प्रतिलिपी शेअर प्रमाणपत्राच्या जारी करण्याविरुद्ध दावे आणि आक्षेप जर काही असल्यास ते मागवित आहे. ते सदर सोसायटीचे सन्मा. सचिव किंवा **श्री. पी. सी. थॉमस,** शॉप क्र. १०ए, एस्टी अपार्टमेंटस, साईबाबा नगर, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९२ यांच्या कार्यालयात १४ दिवसांच्या आत पृष्ठ्यर्थ कागदपत्रांसह दाखल करावेत, कसूर केल्यास आवश्यक ते करण्यात येईल.

सही/–
पी. सी. थॉमस
वकील उच्च न्यायालय

ठिकाण: मुंबई
दिनांक: २३.०६.२०२२

जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, मुंबई उपनगरचा नोंदणी जिल्हा आणि उपजिल्ह्यामध्ये गाव वर्सोवा, सी.टी.एस. क्र. १२०२/ए धारक जमिनीच्या भागावर स्थित असलेले आणि वसलेले फ्लॅट क्र. बी/४०२, पंचमुखी बिल्डिंग, इन्स्टिट्यूट ऑफ फिशरीस, पंचमार्ग यारी रोडलगत, वर्सोवा, अंधेरी (पश्चिम), मुंबई–४०० ०६१ च्या संदर्भात जेव्हीजी फायनान्स लिमिटेडचे तिच्या कायदेशीर स्वाक्षरीकार श्री. धर्मेंद्र पाल सिंह चौहान (विक्रेता) आणि श्री. राकेश जगमोहन पांडे (खरेदीदार) यांच्या दरम्यान निष्पादित नोंदणी क्र. पी १२८१/१९९८ धारक मूळ नोंदणीकृत आणि रितसर मुंद्राकित विक्रीची करार दिनांकित १३ एप्रिल, १९९८ हरविलेले आहे आणि सापडत नाही परंतु सदर मूळ कराराच्या कायदेशीर किंवा बेकायदेशीर ताब्यामध्ये कोणत्याही व्यक्तीद्वारे सदर मूळ विक्रीची करार दिनांकित १३ एप्रिल, १९९८ चा गैरवापर टाळण्याकरिता भरपूर काळजी, खबरदारी म्हणून माझे अशील म्हणजेच श्री. राकेश जगमोहन पांडे यांच्या वतीने सदर प्रसिध्दी करीत आहोत. वरील नमूद परिस्थिती कोणत्याही व्यक्तीकडे सदर मूळ विक्रीचा करार दिनांकित १३ एप्रिल, १९९८ च्या कायदेशीर किंवा बेकायदेशीरपणे ताबा असल्यास आणि विक्री, अदबलाबदल, भेट, गहाण, प्रभार, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, वारसा, मृत्यूपत्र, उत्तराधिकार, देखभाल, सुविधाधिकार, विश्वस्त, कुळवहिवाट, उपकुळवहिवाट, भोगवटा, ताबा, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड कोणत्याही न्यायालयाचा आदेश किंवा निर्देश, कंत्राट/करार, व्यवस्था किंवा अन्यकाहीच्या मार्गे वरील फ्लॅटच्या संदर्भात कोणताही हक्क, नामाधिकार, फायदा, हितसंबंध, दावा, मागणी, धारणाधिकार किंवा बोजा असल्यास त्यांनी लेखी निम्नस्वाक्षरीकाराकडे या प्रसिध्दीच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत अशा दाव्यांकरिता पुष्ठ्यर्थ विलेख किंवा दस्तावेज किंवा सरळ दस्तावेजी पुराव्यासह मूळ विक्रीचा करार उपलब्ध करून दिल्यानंतर त्याच्या/तिच्या दावे काही असल्यास कळविण्याने याद्वारे सल्ला देण्यात येतो. कसूर केल्यास असे दावे या संदर्भात स्वीकारले जाणार नाही आणि उपयोगी नसल्याचे गृहीत धरले जाईल आणि माझे अशील यांच्याकडे कोणत्याही प्रकारे कुठल्याही बोजा नसल्याचे वरील फ्लॅटच्या संदर्भात निर्विवाद आणि स्पष्ट नामाधिकार असल्याचे गृहीत धरले जाईल.

ठिकाण: मुंबई
दिनांक: २३ जून, २०२२.

सही/–
कुणाल आर. मस्कर
वकील आणि सॉलिसिटर्स
५–२११, जी–१, ए विंग, २ रा मजला,
शांती नगर, महाकाली केव्हज् रोड, अंधेरी (पू.),
मुंबई–४०० ०९२

मुंबई येथील लघुवाद न्यायालय आर.ए.ई. आणि आर २०१८ मधील १०८

मे. एसजीएम प्रॉपर्टीज ॲण्ड इन्व्हेस्टमेंट प्रा. लिमिटेड भारतीय कंपनी कायदा, १९५६ अंतर्गत नोंदणीकृत कंपनी, तिचे नोंदणीकृत कार्यालय खोली क्रमांक १५/१६, तळमजला, भूपेन चेंबर्स, ९, दलाई स्ट्रीट, फोर्ट, मुंबई – ४००००१ येथे आहे.

...वादी

विरुद्ध

१. मे. गुलाब ॲण्ड कं. संस्था, जिचे कार्यालय आहे खोली क्रमांक ३४, पहिला मजला, भूपेन चेंबर्स, ९, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई – ४०० ००१ येथे आहे.

२. राजेंद्र यशवंत शाह, वय ६७ वर्ष, त्यांचे कार्यालय खोली क्रमांक ३४, पहिला मजला, भूपेन चेंबर्स, ९, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई – ४००००१.

...प्रतिवादी

प्रति,

वरील नावाचे प्रतिवादी क्र. आणि १ आणि २ ज्याअर्थी वरील नावाचे वादीने प्रतिवादी विरुद्ध वरील खटला दाखल करून विनंती केली आहे की, वादींसाठी खोली क्र. ३४, १ ला मजला, भूपेन चेंबर्स, ९, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई – ४०० ००१; म्हणजेच वादग्रस्त परिसराचा शांततापूर्ण कब्जा सोपविण्यासाठी प्रतिवादीना निर्देय देणारा प्रतिवादीच्या विरोधात आणि वादींच्या बाजूने विभक्षण मधील हुकूम मंजुर करावा आणि ती नफ्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ च्या XX च्या नियम १२ अन्वये चौकशीकरिता आदेश निशाणी बी येथील दाव्याच्या तपशिलानुसार मागीम ३ वर्षे म्हणजेच ०१.०१.२०१५ ते ३१.१२.२०१७ पर्यंत कालावधीकरिता वादग्रस्त परिसरा संदर्भात देय भाडे वादींसह प्रमाणचे कलेक्टर टॅक्स आणि भाडे, पालिका कराची थकबाकी रक्कम अशी रु. २२,८४९.०२ ही रक्कम वादींना चुकती करण्याचे प्रतिवादी आदेश आणि हुकूम द्यावेत. आणि वादामध्ये विनंती केल्यानुसार अशा अन्य पुढील अनुतोषांकरिता.

तुम्हाला याद्वारे समन्स बजावणीपासून ३० दिवसांत तुमचे लेखी विवरण पत्र दाखल करणे आणि वरील नावाचे वादींना उत्तर देण्यासाठी ५ जुलै, २०२२ रोजी दु. २.४५ वा. व्यक्तीचा किंवा रितसर माहिती असलेला आणि वादाची संबंधित सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी सक्षम असलेले किंवा अशा सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी सक्षम अन्य व्यक्ती द्वारे न्यायायल खोली क्र. १९, ०४ था मजला, न्यू ॲनेक्स इमारत, एल.टी. मार्ग, मुंबई – ४००००२ येथील पिठासिन सन्मानीय न्यायाधिशांसमोर हजर राहण्यासाठी समन्स बजावण्यात येत आहेत.

नोंद घ्यावी की, वरील नमूद दिवशी हजर राहण्यास तुम्ही कसूर केल्यास तुमच्या गैरहजेरीत सुनावणी होऊन निर्णय केला जाईल.

तुम्ही सदर सन्माननीय न्यायालयाच्या न्यायायल खोली क्र. १९ मधून सदर वादाची प्रत प्राप्त करू शकतात.

न्यायालय शिक्याने दिले
सदर ११ एप्रिल, २०२२
शिक्का
सही/–
अतिरिक्त प्रबंधक

मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. II, मुंबई येथे

वसूली अधिकारी, डीआरटी–II चे कार्यालय, ३रा मजला, एमटीएनएल भवन, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई–४००००५.

मुळ अर्ज क्र. २३९ सन २०२०

समन्स

परि.: १२

बँक ऑफ बडोदा ......**अर्जदार**
विरुद्ध
मे. इंडो फार्मा आणि अन्य ...**प्रतिवादी**

१. ज्याअर्थी वरील नावाचे अर्जदारांनी त्यातील नमूद इतर अनुतोष आणि चालू आणि भविष्यातील व्याज, खर्चासह एकत्रित रकमेच्या वसुलीसाठी सदर न्यायाधिकरणात वरील उल्लेखित अर्ज दाखल केला आहे.
२. ज्याअर्थी साधारण स्वरुपात समन्सची बजावणी परिणामकारक झालेली नाही आणि ज्याअर्थी सन्माननिय न्यायाधिकरणाद्वारे पर्यायी बजावणीकरिता अर्ज संमत करण्यात आला आहे.
३. तुम्हाला सदर न्यायाधिकरणासमक्ष व्यक्तिशः वा वकिलाद्वारे लेखी विवरणपत्र/म्हणणे दाखल करण्यासाठी आणि विनंतीप्रमाणे अनुतोष का मंजूर करु नये याची कारणे दर्शविण्यासाठी **२६ जुलै, २०२२ रोजी स. ११.०० वा.** उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत.
४. सूचना घ्यावी की, कसूरवार ठरल्यास, तुमच्या अनुपस्थितीत अर्जाची सुनावणी होईल आणि निर्धारित असेल.

हस्ते आणि सदर न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ३० मे, २०२२ रोजी दिले/जारी केले.

शिक्का

सही/–
प्रबंधक
कर्ज वसूली न्यायाधिकरण–II,
मुंबई

प्रतिवादीचे नाव आणि पत्ता:

१. मे. इंडो फार्मा
६, संभाजी कंपाऊंड, तळ मजला, एम.जी.रोड, बोरिवली(पूर्व), मुंबई–४०००६६.

२. श्री. कार्तिक पी.तुराखिया
फ्लॅट क्र.५०३/बी, ५वा मजला, ॲकॉर्ड को ऑप हाऊसिंग सोसायटी लि., डहाणूकरवाडी, कांदिवली(प), मुंबई–४०० ०६७

जाहीर सूचना
रिझॉल्युशन प्लॅन अंतर्गत प्रदानाकरिता

सर्व कामगार / कर्मचारी / परिचालित धनको / स्टेकहोल्डर्सना माहित आहे की रिझॉल्युशन प्लान हा दिनांक १२/१२/२०१७ रोजीच्या आदेशाद्वारे मे. शिर्डी इंडस्ट्रिज लिमिटेडकरिता सन्माननीय एनसीएलटी, मुंबई द्वारे मंजूर करण्यात आला होता, ज्यामध्ये इतर शिलकी व्यतिरिक्त कामगार आणि कर्मचाऱ्याशी संबंधित ईपीएफ, ईएसआयसी, लिव्ह इन्कॅशमेंट, ग्रॅज्युईटी रक्कम आणि नियमित परिचालीत धनकोंशी संबंधित उर्वरित रक्कम जी १२.१२.२०१७ रोजी थकीत आणि देय होती तिचे निराकरण करण्यात आले आहे. ईपीएफ, ईएसआयसी, लिव्ह इन्कॅशमेंट, ग्रॅज्युईटी आणि नियमित परिचालित धनकोंना देय उर्वरित रकमेच्या १५% च्या रिझॉल्युशन प्लान १००% अनुसार ३०.०६.२०२२ रोजी संपणाऱ्या तिमाही पासून ३१.०३.२०२४ पर्यंत ८ तिमाही हप्त्याने देण्यात येणार आहे, त्यानुसार सर्व संबंधित व्यक्तींना याद्वारे खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

एः कामगार आणि कर्मचारी ज्यांचा कालावधी संपलेला आहे.

१. ईपीएफ आणि ईएसआयसी वर्गणी संबंधित प्राधिकरणाकडे प्लाननुसार कंपनीद्वारे जमा करण्यात येईल. लिव्ह इन्कफशमेंट आणि ग्रॅज्युईटी रक्कम त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.
२. सगळ्यांना त्यांच्या निश्चित आणि योग्य खात्यामध्ये प्रदान करणे कंपनीला शक्य होण्यासाठी बँक खाते, पीएफ खाते आणि ईएसआयसी खात्याच्या तपशिलासह त्याचा सध्याचा निवासी पत्ता देण्याची विनंती करण्यात येत आहे.
३. सगळ्यांनी प्रदानापूर्वी रिलिव्हिंग प्रोसिजर (अगोदर केली नसल्यास) पूर्ण करणे सुध्दा आवश्यक आहे. त्यांचे कायदेशीर थकबाकीचे सर्व हप्ते (जे त्यांचे रिलिव्हिंग प्रोसिजर पूर्ण झाल्यानंतर देय बनले आहेत.) अशा पुर्ततेनंतर देण्यात येतील.
४. विद्यमान कामगार/कर्मचारी यांना सुध्दा जर ते संपर्कात असतील तर संबंधित माजी कामगार/माजी कर्मचारी यांना सुध्दा कळविण्याची विनंती करण्यात येत आहे.

बी : परिचालित धनकोना २८/०५/२०१७, १२/१२/२०१७ आणि तारखेरोजीस लेजर अकाऊंट, बॅलन्स सह त्यांच्या सध्याच्या बँक खात्याचा तपशिल कळविण्याची विनंती करण्यात येत आहे.

सी : माहिती ईमेलआयडी : bknath@asisindia.com वर ईमेल द्वारे किंवा अशी माहिती जमा करण्याकरिता कंपनीच्या प्राधिकृत व्यक्तीकडून पोचपावती घेवून आणि व्यक्तीशः सादर करता येईल.

सदर जाहीर सूचना येथे सुध्दा उपलब्ध आहे.
https://www.asisindia.com/wp-content/uploads/2022/06/ Public_Notice_for_payment_210622.pdf

शिर्डी इंडस्ट्रिस लिमिटेड करिता
सही/–
बी. के. नाथ
प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता
दिनांक : २१/०६/२०२२

जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, मुंबई उपनगरच्या हद्दीमध्ये आणि बांद्रा–अंधेरीच्या नोंदणी जिल्हा आणि उपजिल्ह्यामध्ये आणि सर्व्हे क्र. ६ (६०० ते ६०३), मुंबई–४०० ०५० धारक गाव बांद्रा येथे स्थित आणि असलेले प्लॉट क्र. ११४, बायरामजी जीजीभॉय रोड, बांद्रा (प) वर तिसरा मजला, सी बर्ड बिल्डिंग, नव सवेरा को– ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीच्या फ्लॅट क्र. ६ए, मोजमापित १९२ चौ.फू. असलेली मिळकत ("**सदर मिळकत**") च्या संदर्भात श्री. जयराम हेगडे ("**मालक**") यांचा नामाधिकार तपास करीत आहोत. सदर मिळकतीच्या मालक यांचे नामाधिकार तपास करण्याचे भाग म्हणून आमचे अशील श्री. विजय रावल यांचे सूचनेनुसार आम्ही सदर जाहीर सूचना जारी करीत आहोत.

कोणत्याही व्यक्ती/हक्कदार (कोणत्याही बँक/वित्तीय संस्था समाविष्टीत) यांना कोणत्याही हस्तांतर योग्य विकास हक्क (टीडीआर), फ्लोर स्पेस इंडेक्स (एफएसआय), किंवा कोणत्याही बांधकामीत क्षेत्र किंवा त्यावर बांधकाम होणारे क्षेत्र समाविष्टीत सदर मिळकतीच्या संदर्भात आणि/किंवा कोणत्याही भागासंबंधित विक्री, हस्तांतर, गहाण, अभिहस्तांतर, जप्ती, अदलाबदल, प्रभार, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, कुळवहिवाट, उपकुळवहिवाट, सुविधाधिकार, धारणाधिकार, प्रलंबित वाद, सोडून देने, भेट, न्यास, देखभाल, भागीदारी, वचन, अग्रक्रय, वहिवाटीचा हक्क किंवा अन्यथा कोणत्याही व्यवस्था द्वारे विलेख, दस्तावेज, लेखी, लिव्ह अँड लायसन्स, काळजीवाहू तत्व, उत्तराधिकार, भोगवटा, ताबा, फायदेशीर हक्क, हितसंबंध, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, खटला, कोणत्याही न्यायालयाचा निकाल किंवा न्यायालयीन आदेश, कंत्राट/करार किंवा बोजा किंवा अन्य काहीच्या मार्गे कोणताही दावा, मागणी, वाद, हक्क, नामाधिकार, फायदा, हितसंबंध असल्यास त्यांनी या सूचनेच्या तारखेपासून **१४ दिवसांत** अशा दावा करण्यात आलेले दस्तावेजच्या प्रतिसह लेखी खाली नमूद पत्त्यावर निम्नस्वाक्षरीकाराकडे सदर कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास अशा दावे, हक्क, नामाधिकार, फायदा, हितसंबंध किंवा मागणी अशा व्यक्ती/हक्कदार कडून सोडून दिला आणि/किंवा त्यागित केला गृहीत धरला जाईल आणि अशा दावा अस्तित्वात नसल्याचे गृहीत धरला जाईल.

दिनांक २३ जून, २०२२
ए अँड पी पार्टनर्सकरिता
वकील
#२०८, २ रा मजला,
एम्बेसी सेंटर, जमनालाल बजाज रोड,
नरिमन पॉईंट, मुंबई–४०० ०२१

जाहीर सूचना

आम्ही आमचे आशील मे. रेल्कॉन इन्फ्राप्रोजेक्टस् लिमिटेड, कंपनी अधिनियम, १९५६ च्या तरतुदी अन्वये गठीत एक कंपनी आणि त्यांचे नोंदणीकृत कार्यालय येथे ४था मजला, रेल्कॉन हाउस प्रिमायसेस सीएसएल, प्लॉट १५/ए, एम. जी. रोड, विले पार्ले पूर्व, मुंबई ४०००५७, आणि रेल्कॉन झेडपी जेई कंस्ट्रकशन एलएलपी, मर्यादित दायित्व भागिदारी अधिनियम, २००८ च्या तरतुदी अन्वये रिक्तसर नोंदणीकृत एक मर्यादित दायित्व भागिदारी संस्था आणि त्यांचे कार्यालय येथे ३०१/३०२, साई अर्पण, बी–११, साई कॉम्प्लेक्स, पी जी वोरा रोड, मिरा रोड, मुंबई ४०११०७ यांचे नामाधिकार तपासत आहोत, ज्यांना मुंबईच्या नोंदणी उपजिल्हा मधील गाव एकसर, तालुका बोरीवली, मुंबई उपनगर जिल्हा येथे स्थित सीटीएस क्रं. १४२० ए धारक जमिन असलेले त्यांच्या मिळकत पुर्नविकासाकरिता शैलेश विहार सीएचएस लिमिटेड द्वारे विकास हक्क देण्यात आले आहे आणि या खाली परिशिष्टात आधिक तपशिलवारपणे विवर्णित आहे. तसेच या खालील परिशिष्टात आधिक तपशीलवारपणे त्यांच्या मिळकतीच्या संदर्भात शैलेश विहार सीएचएस लिमिटेडचे नामाधिकार तपासत आहेत.

कोणत्याही व्यक्ति/व्यक्तिंचा सदर मिळकतीवर किंवा विरुध्द किंवा कोणत्याही भागा संदर्भात विक्री, अदलाबदल, विकास हक्क देणे, गहाण, प्रभार, भेट, न्यास, देखभाल, ताबा, कुळवहीवाट, वारसा, भडेपटटा, लिव्ह ॲण्ड लायसेंस, धारणाधिकार किंवा अन्य काहीच्या मार्गे कोणताही दावा असल्यास त्यांनी या सूचनेच्या प्रसिध्दीच्या तारखेपासून १० (दहा) दिवसांचा कालावधीत खालील नमूद पत्त्यावर निम्नस्वाक्षरीकराकडे पुष्ठ्यर्थ दस्तावेज सह लेखी सदर कळविणे या द्वारे विनंती आहे, कसूर केल्यास असा दावा अस्तित्वात नसल्याचे गृहीत धरले जाईल आणि / किंवा सदर अस्तित्वात नसल्याचे/सोडून दिला/ त्यागित केला असे गृहीत धरले जाईल.

मिळकतीचा परिशिष्ट

मुंबईचा नोंदणी उपजिल्हा मध्ये गाव एकसर, तालुका बोरिवली मुंबई उपनगर जिल्हा येथे स्थित सीटीएस क्रं. १४२० ए मोजमापित ३,२४५.९ चौ. मिटर्स, १४२०/१ मोजमापित २२.६ चौ. मिटर्स, १४२०/२ मोजमापित १९८ चौ. मिटर्स, १४२०/३ मोजमापित २२.० चौ. मिटर्स, १४२०/४ मोजमापित २५.० चौ. मिटर्स, १४२०/५ मोजमापित २५.० चौ. मिटर्स, १४२०/६ मोजमापित ३४०.६ चौ. मिटर्स आणि १४२०/७ मोजमापित २२.० चौ. मिटर्स, १४२०/८ मोजमापित ४३.० चौ. मिटर्स आणि १४२०/९ मोजमापित ६.२ चौ. मिटर्स एकूण ३,७७२.१० चौ. मिटर्स आणि जे आता दिनांक ३१.१२.२०१४ चा जिल्हा अधिकारी आदेश आणि शहर सर्व्हे अधिकारीचा आदेश दिनांकींत ७.३.२०१५ ला अनुसरून सीटीएस क्रं. १४२० ए मोजमापित ३,७७२.१० चौ. मिटर्स मध्ये एकत्रीत केला.

पश्चिम किंवा त्यादिशेने : १४.३० मिटर रुंद एस. व्ही. पी रोड दक्षिण किंवा त्यादिशेने : सीटीएस क्रं. १४१९ आणि १४२३, गाव एकसर, पूर्व किंवा त्यादिशेने सीटीएस क्रं.१४२१, गाव एकसर

दिनांक २३ जून २०२२

मे दिवेकर भागवत ॲण्ड कं.
वकिल आणि सोलिसिटर्स
सही/–
पत्ताः सी– १०२, ठोसर हाउस,
हनुमान क्रॉस रोड क्रं १,
विले पार्ले पूर्व, मुंबई ४०००५७
ईमेलः office@divekarbhagwat.com

बजाज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

कॉर्पोरेट कार्यालय : सेरेब्रम आयटी पार्क, बी२ इमारत, ५वा मजला, कल्याणी नगर, पुणे, महाराष्ट्र ४११०१४
शाखा कार्यालय: ४था मजला, सुमंगल हाऊस, ब्लॉक क्र. ८, सुप्रिम किडनी केअर हॉस्पिटल जवळ, साधू वासवानी रोड, मायको सर्कल जवळ, नाशिक–४२२००१, **शाखा कार्यालय:** १ला मजला, अशर आयटी पार्क, जयश्री बाग, रोड क्र. १६, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे, महाराष्ट्र ४००६०४

कब्जा सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३(४) सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८–(१) अन्वये.(जोडपत्र–VI)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकारांनी मे. बजाज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (बीएचएफएल) चे प्राधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये आणि कलम १३(२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ च्या नियम ३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून सदर सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसात सूचनेत नमूद केलेली रक्कम चुकती करण्यासाठी खालील नमुद कर्जदार/सह कर्जदार/हमीदार यांना मागणी सूचना जारी केली होती. कर्जदार/सह कर्जदार/हमीदार यांनी रक्कम चुकती करण्यास कसूर केली आहे म्हणून कर्जदार/सह कर्जदार/हमीदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना याद्वारे देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी मे. बजाज हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या वतीने ॲक्टच्या कलम १३(४) सहवाचता सदर नियमावलीच्या नियम ८–(१) अन्वये त्यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून येथील खालील वर्णिलेल्या मिळकतीचा कब्जा घेतला आहे. विशेषतः कर्जदार/सह कर्जदार/हमीदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावधान करण्यात येते की, त्यांनी सदर मिळकतीसह व्यवहार करू नये आणि मिळकतीसह केलेला कोणताही व्यवहार हा त्यावरील पुढील व्याजासह खालील नमुद रकमेकरिता बीएचएफएल च्या प्रथम प्रभाराच्या अधिन राहील.

कर्जदार/ हमीदाराचे नाव (एलएएन क्र. शाखेचे नाव)	तारण मत्तेचे वर्णन (स्थावर मिळकत)	मागणी सूचना तारीख आणि रक्कम	कब्जाची तारीख
शाखा : चोपडा **(एलएएन क्र. एच४एम२एफआरएल०३३६३९४)** **१. रोहिदास हिमत भोई** (कर्जदार) **२. सुरेखाभाई रोहिदास भोई** (सह कर्जदार) **वरील येथे:** भोईवाडा, पैलाड अमळनेर जि. जळगाव – ४२५४०१	**वर्णिलेल्यानुसार बिनशेतजमीन मिळकतीचे सर्व ते भाग आणि विभाग वर्णन:** सी टी एस क्र. २०२/बी येथे अमळनेर ता. अमळनेर जिल्हा जळगाव ता. अमळनेर महाराष्ट्र – ४१३२०७, पूर्व :– सीटीएस क्र. २०४/ए आणि २०४/बी, पश्चिम :– पैलाड सीटीएस क्र. २०२/ई, उत्तर :– पैलाड सीटीएस क्र. २०५, दक्षिण :– रस्ता	२२ फेब्रुवारी, २०२२ रु. ५,४१,४२४/– (रुपये पाच लाख एकेचाळीस हजार चारशे चोवीस मात्र)	१७ जून २०२२
शाखा : मुंबई **(एलएएन क्र. ४०५एचबीटी९७४९६५५८ आणि ४०५एचटीपी९७५६५४९५)** **१. संदीप मनहर धनक** (कर्जदार) २. लक्ष्मी एस मेधरमेटला (सह कर्जदार) वरील येथे: फ्लॅट क्र. ३०३ ए विंग ३रा मजला लेक व्ह्यु को ऑप हाऊ सोसायटी गाव समेळ वसई पालघर, ठाणे – ४०१२०३	**वर्णिलेल्यानुसार बिनशेतजमीन मिळकतीचे सर्व ते भाग आणि विभाग वर्णन:** फ्लॅट क्र. ३०३, ३रा मजला, ए विंग, मोजमापित ५८० चौफू, लेक व्ह्यु अपार्टमेंट, गाव समेळ, ता. वसई, नालासोपारा पश्चिम, पालघर, ठाणे, महाराष्ट्र–४०१२०३	२८ फेब्रुवारी, २०२२ रु. २७६२१२९/– (रुपये सत्तावीस लाख बासष्ट हजार एकशे एकोणतीस मात्र)	२१ जून २०२२

दिनांक: २३/०६/२०२२ ठिकाण:– महाराष्ट्र **प्राधिकृत अधिकारी, बजाज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**

कब्जा सूचना (स्थावर मिळकतीकरिता) नियम ८–(१)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार यांनी **आयआयएफएल होम फायनान्स लिमिटेड** (याआधी इंडिया इन्फोलाईन हाऊसिंग फायनान्स लि. नावे ज्ञात) (आयआयएफएल–एचएफएल) चे प्राधिकृत अधिकारी म्हणून दि सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ चा नियम ३ सहवाचता कलम १३(१२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून येथील खालील नमूद कर्जदार/सह–कर्जदार यांना सूचनेमध्ये नमूद केलेली रक्कम चुकती करण्यासाठी बोलाविण्याकरिता कंपनीच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे मागणी सूचना निर्गमित केलेली होती. कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी त्यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून सदर अधिनियमाचे कलम १३(४) अन्वये यात याखाली वर्णन केलेल्या मिळकतीचा **कब्जा घेतलेला आहे**. विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनता यांना याद्वारे सावधान करण्यात येते की, त्यांनी सदर मिळकतीच्या देवघेवीचा व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीवरील कोणताही देवघेवीचा व्यवहार हा **आयआयएफएल एचएफएल** च्या खालील नमूद रकमेसह त्यावरील व्याजाच्या प्रभाराअधीन राहील.

ॲक्टच्या कलम १३ च्या पोटकलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येते. जर विक्री किंवा हस्तांतरणासाठी निर्धारित तारखेपूर्वी कोणत्याही वेळी झालेल्या सर्व खर्च, परिव्यय आणि आकार यासह **आयआयएफएल एचएफएलची** थकबाकी कर्जदारांनी चुकती केली तर **आयआयएफएल एचएफएल** कडून तारण मत्तांची विक्री किंवा हस्तांतरण केले जाणार नाही आणि तारण मत्तांच्या विक्री किंवा हस्तांतरणासाठी **आयआयएफएल एचएफएल** कडून पुढील पावले उचलली जाणार नाहीत.

कर्जदार/सह–कर्जदारांचे नाव	तारण मत्तेचे वर्णन (स्थावर मिळकत)	एकूण देय थकबाकी (रु.)	मागणी सूचनेची तारीख	कब्जाची तारीख
श्री. रितेश राकेश मोहंती सौ. संगीता रितेश मोहंती **(प्रॉस्पेक्ट क्र. ९२१०८४ आणि ७७०९१३)**	चे सर्व ते भाग आणि विभाग: फ्लॅट क्र. ६०६, ए विंग, क्षेत्र मोजमापित ६७२ चौ.फूट, मेघना मोंटाना, बारवी डॅम रोड, शिव मंदिर चिखलोली, अंबरनाथ, ठाणे–४२१५०१, महाराष्ट्र, भारत.	**प्रॉस्पेक्ट क्र. ९२१०८४,** **रू. ५,७२,५१०/–** (रूपये पाच लाख बहात्तर हजार पाचशे दहा मात्र) **आणि** **प्रॉस्पेक्ट क्र. ७७०९१३,** **रू. २२,२५,७९७/–** (रूपये बावीस लाख पंचवीस हजार सातशे सत्त्याणव मात्र)	२५–मार्च–२०२२	२०–जून–२०२२

पुढील तपशिलासाठी कृपया प्राधिकृत अधिकारी यांना **शाखा कार्यालय:**– आयआयएफएल हाऊन, सन इन्फोटेक पार्क रोड क्र. १६V, प्लॉट क्र. बी–२३, ठाणे इंडस्ट्रियल एरिया, वागळे इस्टेट, ठाणे–४००६०४ येथे प्राधिकृत अधिकाऱ्यांना/ किंवा **कॉर्पोरेट कार्यालय:** प्लॉट क्र. ९८, फेझ– IV, उद्योग विहार, गुरगाव, हरियाणा यांना संपर्क करावा.

ठिकाण : ठाणे, दिनांक : २३.०६.२०२२ **सही/– प्राधिकृत अधिकारी, आयआयएफएल होम फायनान्स लि. करिता**

ई–लिलाव नि विक्री करिता जाहीर सूचना (परिशिष्ट–IV ए)(नियम ८(६))

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (यानंतर ॲक्ट) अंतर्गत आयआयएफएल होम फायनान्स लिमिटेड (पूर्वी इंडिया इन्फोलाईन हाऊसिंग फायनान्स लि. अशी ज्ञात) (आयआयएफएल–एचएफएल) कॉर्पोरेट कार्यालय प्लॉट क्र. ९८, उद्योग विहार, फेज–IV, गुरगाव – १२२०१५ (हरियाणा) आणि **शाखा कार्यालय : सीटीएस क्र. ४२७८/१ ते ७, तानाजी नगर, कालिका माता मंदिर जवळ, २ रा मजला, चिंचवड पुणे ४११०३३** कडे गहाण स्थावर मिळकतीची विक्री. ज्याअर्थी आयआयएफएल–एचएफएल चा प्राधिकृत अधिकाऱ्यांनी (एओ) आयआयएफएल–एचएफएल ची थकबाकी वसुल करण्यासाठी **'जे आहे जेथे आहे तत्वाने आणि जे आहे जसे आहे तत्वाने'** तिच्या विक्रीच्या हक्कासह खालील कर्ज खाते/प्रॉस्पेक्ट क्र. मधील ॲक्टच्या कलम १३(२) अंतर्गत जारी सूचनेला अनुसरून खालील मिळकत/तींचा कब्जा घेतला आहे. विक्री वेबसाईटः **www.bankeauctions.com** येथे पुरविलेल्या ई–लिलाव फ्लॅटफॉर्म मार्फत निम्नस्वाक्षरीकारांद्वारे करण्यात येईल.

कर्जदार/सह–कर्जदार/ हमीदारांचे नाव	मागणी सूचना तारीख आणि रक्कम	तारखेनुसार एकूण थकबाकी:	राखीव किंमत
१. श्री. लाहू अशरुबा जाधव २. मे. योगीराज ॲग्रो फूड्स (जाधव लाहू असरुबा एचयुएफ ३. श्री. मुकेश लालू जाधव, ४. सौ. मंगल लाहू जाधव, ५. मे. आनंद ट्रेडिंग कं., ६. मे. ममता एन्टरप्रायझेस **(प्रॉस्पेक्ट क्र. ७२२६३० आणि ७२२६२९)**	**०७–फेब्रु–२०२०** **रु. १८,४४,५८,८७९/–** (रुपये अठरा करोड चौवेचाळीस लाख अठ्ठावन्न हजार आठशे एकोणाऐंशी फक्त)	**१७–जून–२०२२** **रु. १९,६५,४८,२१५/–** (रुपये एकोणीस करोड पासष्ट लाख अठ्ठेचाळीस हजार दोनशे पंधरा फक्त)	**रु.२५,४२,९६,०००/–** (रुपये पंचवीस करोड बेचाळीस लाख शह्याण्णव हजार फक्त)
	बोली वाढीव रक्कम	**कब्जाची तारीख**	**इसारा अनामत रक्कम (इअर):**
	रु. १०,००,०००/– (रुपये दहा लाख फक्त)	**२७–मे–२०२२**	**रु. २,५४,२९,६००/–** (रुपये दोन करोड चोपन्न लाख एकोणतीस हजार सहाशे फक्त)

स्थावर मिळकत/तारण मत्तेचे वर्णन

१. संपूर्ण स्टिल्ट मजला (कमर्शिअल प्रिमायसेस), मोजमापित ३१.५५ चौ.मीटर्स (बिल्ट अप क्षेत्र) म्हणजेच २५.१७ चौ.मीटर्स (चटई क्षेत्र) आणि बेसमेंटचे संपूर्ण समाविष्ट सर्व ते
२. संपूर्ण पहिला मजला (कमर्शिअल प्रिमायसेस), मोजमापित ३३८.७५ चौ.मीटर्स (बिल्ट अप क्षेत्र) म्हणजेच ३०७ चौ.मीटर्स (चटई क्षेत्र)
३. ओझोन नावे ज्ञात इमारतीमध्ये संपूर्ण दुसरा मजला (कमर्शिअल प्रिमायसेस), मोजमापित २९६.२१ चौ.मीटर्स (बिल्ट अप क्षेत्र) म्हणजेच २८०.९४ चौ.मीटर्स (चटई क्षेत्र) सह १४ कार पार्किंग जागा आणि ४४ स्कूटर पार्किंग जागा सह जमीनीमधील ४२.८९ अविभाजित शेअर्स म्हणजेच मोजमापित ५२८.०२३ चौरस मीटर्स सर्व्हे क्र. १२९+१३०/१+२ पैकी जमीन धारक प्लॉट क्र. ९२ वर बांधलेले ज्याचे संलंग्न सीटीएस क्र. ११३२ आणि ११३३, मोजमापित १२४८.६१ चौ.मीटर्स (चटई क्षेत्र) येथे स्थित असलेले आणि वसलेले औंध, जिल्हा पुणे
४. संपूर्ण तिसरा मजला (कमर्शिअल प्रिमायसेस), मोजमापित २८०.९४ चौ.मीटर्स (बिल्ट अप क्षेत्र) म्हणजेच ५३५४ चौ.मीटर्स (चटई क्षेत्र) सह जमीनीमधील अविभाजित शेअर्स मोजमापित ३१०.७१ चौरस मीटर्स म्हणजेच ३३४३.३० चौ.मीटर्स
५. औंध, तालूका पुणे शहर, जिल्हा पुणे येथे स्थित असलेले आणि वसलेले सर्व्हे क्र. १२९+१३०/१+२, तसेच ज्यांचा संलंग्न सीटीएस क्र. ११३२ आणि ११३३, मोजमापित १२४८.६१ चौ.मीटर्स पैकी प्लॉट क्र.९२ वर समाविष्ट ओझोन नावे ज्ञात इमारतीमध्ये संपूर्ण चौथा मजला (कमर्शिअल प्रिमायसेस), मोजमापित ३३५.८२ चौ.मीटर्स (बिल्ट अप क्षेत्र) म्हणजेच ६२९१ चौ.मीटर्स (चटई क्षेत्र) सह ५ कार पार्किंग जागा आणि १५ स्कूटर पार्किंग जागा सह जमीनीमधील ४१.३४६ अविभाजित शेअर्स म्हणजेच मोजमापित ५१६.२५ चौरस मीटर्स.

मालमत्तेची तपासणीची तारीख	इअर शेवटची तारीख	ई–लिलावाची तारीख/वेळ
२७–जुलै–२०२२	२९–जुलै–२०२२	०१–ऑगस्ट–२०२२ ११०० ते १३.०० पर्यंत

प्रदानाचे माध्यम : सर्व प्रदान हे गुरुग्राम येथे देय **'आयआयएफएल होम फायनान्स लिमिटेड'** च्या नावे डिमांड ड्राफ्ट द्वारे किंवा आरटीजीएस/एनईएफटी मार्फत करणे आवश्यक आहे. खात्याचा तपशील खालीलप्रमाणेः **ए) खात्याचे नाव : आयआयएफएल होम फायनान्स लि., बी) बँकेचे नावः स्टॅण्डर्ड चार्टर्ड बँक लि., सी) खाते क्र. ५३१०५०६६२९४, डी) आयएफएससी कोड : SCBL0036025 किंवा पेमेंट लिंकः https://quickpay.iiflfinance.com.**

अटी आणि शर्ती:–

१. ई–लिलावात सहभागी होण्याकरिता इच्छुक बोलीदारांनी सेवा पुरवठादार **https://www.bankeauctions.com** कडे त्यांचा तपशील नोंदविणे आणि लॉगईन अकाऊंट, लॉगईन आयडी आणि पासवर्ड तयार करणे आवश्यक आहे. इच्छुक बोलीदारांनी वरील नमूद शाखा कार्यालयात इअरसाठी प्रदानाचा तपशील केवायसी आणि पॅन कार्डच्या प्रतींसह त्यांचे निविदा प्रपत्र पाठविणे/सादर करणे आवश्यक आहे.
२. बोलीदारांनी रकाना बोली वाढविण्याची रक्कम मध्ये नमूद रकमेच्या पटीत त्यांचे प्रस्ताव वाढविणे आवश्यक आहे. जर बोली लिलावाच्या समाप्तीच्या वेळेच्या अंतिम ५ मिनिटांमध्ये केल्यास, समाप्तीचा वेळ आपोआप ५ मिनिटांकरीता विस्तारित होईल.
३. यशस्वी बोलीदारांनी एओ यांनी बोली मुल्य स्विकारल्यापासून २४ तासात (इअर समायोजित केल्यानंतर) बोली रकमेच्या २५% आणि बोली रकमेच्या उर्वरित ७५% तारण धनकोंनी विक्री निश्चित केल्याच्या तारखेपासून १५ दिवसांत जमा करणे आवश्यक आहे. सर्व जमा आणि प्रदान हे प्रदानाच्या विहित माध्यमाने करायचे आहे.
४. खरेदीदाराने सेस, प्रयोज्य मुद्रांक शुल्क आणि कोणतीही अन्य वैधानिक थकबाकी किंवा इतर थकबाकी जसे की पालिका कर, वीज प्रभार, जमीन आणि मिळकतीशी संबंधित सर्व कर आणि दरासह इतर अनुषांगिक खर्च, प्रभार भरायचे आहेत.
५. बोलीदारांना ई–लिलाव विक्री प्रक्रियेत भाग घेण्यासाठी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी लिलाव विक्री आणि लिलाव अर्जाच्या तपशिलवार अटी आणि शर्तीकरिता वेबसाईट **https://bankeauctions.com** आणि **https://www.iifl.com/home-loans/properties-for-auction** मार्फत जाण्याचा सल्ला देण्यात येत आहे.
६. तपशील, मदत प्रक्रिया आणि ई–लिलावावरील ऑनलाईन प्रशिक्षणाकरिता बोलीदार सेवा पुरवठादार ई–मेल आयडी : **support@bankeauctions.com सपोर्ट हेल्पलाईन नंबर : @7291981124/25/26 यांना मिळकतीशी संबंधित चौकशीसाठी श्री. निलेश संगमनेर @ ९८९००५३०३५, ईमेल आयडी: nilesh.sangamnekar@iifl.com** यांना संपर्क करू शकतात.
७. वरील सदर कर्जदारांना ७ दिवसांत प्रत्यक्ष कब्जा घेतेवेळी तारण मत्तेमध्ये असलेल्या घरगुती वस्तु घेवून जाण्यासाठी सूचना याद्वारे देण्यात येत आहे. अन्यथा आयआयएफएल–एचएफएल कोणत्याही परिस्थितीत मिळकतीच्या नुकसानीसाठी जबाबदार राहणार नाही.
८. पुढे कर्जदारांना याद्वारे सूचना देण्यात येते की, जर त्यांनी सदर वस्तु घेवून जाण्यास कसूर केली तर वरील सदर वस्तु कायद्यानुसार विकण्यात येतील.
९. वरील विहित वेळेत यशस्वी बोलीदार/लिलाव खरेदीदाराने कोणत्याही टप्प्यावर प्रदानात कसूर केली तर विक्री रद्द करण्यात येईल आणि अगोदर जमा केलेली रक्कम (इअर समाविष्टीत) जप्त करण्यात येईल आणि मिळकत पुन्हा विक्रीसाठी ठेवण्यात येईल.
१०. एओ यांनी कोणतेही कारण न देता निविदा/लिलावाच्या अटी आणि शर्ती बदलणे किंवा पुढे ढकलणे/रद्द करण्याचा हक्क राखून ठेवला आहे. निविदा/लिलावामध्ये कोणताही वाद झाल्यास आयआयएफएल–एचएफएच्या एओचा निर्णय अंतिम राहील.

सरफैसी ॲक्ट, २००२ च्या नियम ९ उप–नियम (१) अन्वये ३० दिवसांची विक्री सूचना

कर्जदारांना निविदा/लिलावाच्या तारखेपूर्वी तारखेपर्यंत व्याज आणि अनुषांगिक खर्चासह वरील नमूद रक्कम चुकती करण्यासाठी याद्वारे सूचीत करण्यात येत आहे, कसूर केल्यास मिळकतीच्या लिलाव/विक्री करण्यात येईल आणि उर्वरित थकबाकी काही असल्यास व्याज आणि खर्चासह वसुल करण्यात येईल.

ठिकाणः पुणे, दिनांकः २१–जून–२०२२ **प्राधिकृत अधिकारी, आयआयएफएल होम फायनान्स लिमिटेड**